# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **27/10/2020**

**Brief of the work done :-**

मालेगाव - चार सराईत चोरटे पोलिसांच्या जाळ्यात, सिनेस्टाईल पाठलाग करून पकडले. दि. २७/१०/२०२०

पुण्यनगरी

## चार सराईत चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

### सिनेस्टाईल पाठलाग करून पकडले; इंडिका जप्त

**मालेगाव**, दि. २७ (प्रतिनिधी)

जनावरे चोरण्यात सराईत गुन्हेगार असलेले चार जण रात्रीच्या वेळी एका इंडिका कारमध्ये फिरत असताना मालेगाव पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग २६ ऑक्टोबर रोजी रात्री ताब्यात घेतले. या चोरट्यांनी अनेक जनावरे चोरल्याची कबुली दिली आहे.

मालेगाव शहरात २६ ऑक्टोबर रोजी रात्री दरम्यान मालेगाव पोलीस रात्रीची पेट्रोलिंग करीत असताना इंडिका कार एम.एच.११, बी.डी.५००४ ही शहरात संशयास्पद फिरताना दिसली. या गाडीमध्ये असलेल्या युवकांनी पोलिसांची गाडी दिसतात त्यांची कार वेगात घेवून पलायन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संशय आल्याने त्यांनी कारचा सिनेस्टाईल पाठलाग करीत मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन चौकशी केली. यावेळी कारमध्ये दोन धारदार तलवारी शस्त्र मिळाले. तसेच त्यांची कसून चौकशी केली असता चारही आरोपी अकोट फाइल अकोला पोलीस स्टेशन हद्दीतील असून सराईत जनावरे चोर असल्याचे आढळून आले. त्यांचे सर्व रेकॉर्ड अकोला स्थानिक गुन्हे शाखेकडे असून याबाबतची त्यांची सर्व माहिती मालेगाव पोलिसांनी घेतली. या माहितीवरून अटक केलेल्या सराईत आरोपींमध्ये शेख युसुफ शेख रिजवान (वय २०) रा. अकोट फैल, अज्जू खान (वय २५) रा. भारत नगर, शेख अनिस (वय २६) रा. सलाम नगर, शेख सोईन शेख इर्शाद (वय २७) रा. साबरी मज्जिद सर्व रा अकोला येथील असून यांच्यावर मालेगाव पोलीस स्टेशन मध्ये आर्म ऍक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली हेड पोलीस कॉन्स्टेबल पवार, पोलीस गजानन झगरे आदी पोलिस कर्मचाऱ्यांनी केली.

> अटकेत असलेले चारही आरोपींवर जिल्ह्यातील इतर पोलिस ठाण्यात सुद्धा जनावर चोरी सारखे गुन्हे दाखल असतील तर त्यांनी नमूद आरोपींना मालेगाव न्यायालयातून ताब्यात घेण्याची कायदेशीर कारवाई करावी.
>
> **-आधारसिंग सोनोने,** ठाणेदार, पोलीस स्टेशन मालेगाव.

